म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५५८



# ॥ कैवल्याचे झाड ॥

बा. भ. बोरकर

काव्य २५५९
२५३४८
७।७।८८

काव्य
२५५९

२५५९
काव्य २५३४८
७।७।८८

# कैवल्याचे झाड

संकलित भक्तिकविता

बा० भ० बोरकर

सुरेश एजन्सी, पुणे

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

© श्रीमती रुक्मिणीबाई बोरकर
पर्वरी आल्त, बार्देश-गोवा

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

प्रकाशन-दिन
चैत्री पूर्णिमा, १४ एप्रिल १९८७

किंमत : तीस रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती, टिळक रोड
पुणे ४११०३०

# भक्तिकवितांच्या निवडीविषयी

कविवर बा. भ. बोरकर यांच्या कवितासंभारात प्रेमकवितांची जशी विपुलता आहे, तशीच भक्तिकवितांचीही विपुलता आहे. त्यांच्या निवडक प्रेमकविता आम्ही 'बोरकरांची प्रेमकविता' या संकलनाच्या रूपाने मराठी रसिकांच्या हाती १९८४ च्या अखेरीस दिलेल्या आहेत. 'कैवल्याचे झाड' हा त्यांच्या ८१ भक्तिकवितांचा संग्रह आम्ही आज प्रकाशित करीत आहोत. या संग्रहातील ८१ कवितांची निवड 'जीवनसंगीत'पासून 'चिन्मयी'पर्यंतच्या बोरकरांच्या नऊही प्रकाशित काव्यसंग्रहांतून केलेली असून, शेवटी 'ईशावास्योपनिषद्' आणि 'भज गोविन्दम्' या दोन संस्कृत रचनांचे त्यांनी केलेले अनुवाद समाविष्ट केले आहेत.

कोवळ्या वयात घरी-दारी घडत राहिलेल्या संतवाणीच्या गाढ संस्कारांमुळे बोरकरांच्या मनात पहिली कविता उमलली, ती अभंग-रूपात. पुढे जरी त्यांनी नाना छंदांचा, जातींचा, चालींचा अवलंब केला असला, तरी अभंगाविषयीचे त्यांचे प्रेम अखेरपर्यंत अभंग राहिले. त्यांच्या प्रकाशित संग्रहांतील अभंगांची संख्या ४० आहे. हे त्यांचे सर्व अभंग निवडून, 'बाकीचे अभंग' या नावाने प्रकाशित करण्याची कल्पना आम्ही यापूर्वी जाहीरही केली होती. परंतु बोरकरांच्या काही रसिक मित्रांच्या सूचनांवरून आम्ही असे ठरविले की, त्यांचे केवळ अभंगच नव्हेत, तर आध्यात्मिक भाव-विचारांनी भारलेली त्यांची सर्वच प्रातिनिधिक रचना एकत्रित करून प्रकाशित करावी. 'कैवल्याचे झाड' हे त्या रसिक मित्रांच्या उचित सूचनांचे प्रकट रूप आहे.

'जीवनसंगीत'पूर्वीच्या (म्हणजे 'प्रतिभा' या आद्य काव्यसंग्रहाच्या काळातल्या) आणि 'जीवनसंगीत' ते 'चिन्मयी' पर्यंतच्या नऊ संग्रहांतल्या आणखीही पंधरा-वीस कविता प्रस्तुत संग्रहात समाविष्ट होण्याजोग्या आहेत, याची आम्हाला जाणीव आहे. परंतु आम्ही ठरविलेल्या पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे त्यांचा मोह आम्हाला आवरावा लागला आहे.

प्रीती आणि भक्ती हे बोरकरांच्या कवितेचे दोन असाधारण विशेष आहेत. ही दोन 'जवळिकेची सरोवरे' उचंबळून येतात, तेव्हा अनेकदा परस्परांत मिसळून जातात. अलौकिकाच्या पातळीवर पोचणारी प्रीती भक्तीत परिणत

होते आणि लौकिकाचे रंग लेऊन प्रकटणारी भक्ती प्रीतीचे माधुर्य पावते. यामुळेच बोरकरांच्या काही प्रेमकविता भक्तिकवितांच्या या संकलनात स्वाभाविकपणेच समाविष्ट होऊ शकल्या. या संकलनातील क्र. ४, ९, १०, ४०, ४२ व ४३ या सहा कविता 'बोरकरांची प्रेमकविता' या संकलनातही (क्र. २९, ४०, ४१, ७९, ८१, ८२ व ८९) पूर्वी समाविष्ट झालेल्या आहेत.

'कांचनसंध्या' या संग्रहात ज्या बारा अभंगबद्ध कविता 'काही अभंग' या शीर्षकाखाली समाविष्ट आहेत, त्यांपैकी पहिली कविता ही पत्नीला / प्रियेला उद्देशून असल्यामुळे प्रस्तुत संकलनात वगळली आहे आणि उरलेल्या अकरा कवितांना (क्र. ४५ ते ५०, ५५, ५६ व ५९ ते ६१) उचित शीर्षके देऊन, त्यांचा रचनाकालानुसार समावेश केला आहे.

'कांचनसंध्या'मध्ये प्रकाशित झालेल्या या बारा शीर्षकहीन अभंगांपैकी एक अभंग (क्र. ३; पृ. १३०–१३१) 'बोरकरांची प्रेमकविता' या संकलनात (पृ. ११९) 'चेटूक' या शीर्षकाने समाविष्ट केलेला आहे, तर प्रस्तुत संकलनात (पृ. ५०) तोच अभंग 'त्याची मज बाई सोडवेना ओढ' या शीर्षकाने समाविष्ट केलेला आहे.

'मागणे' या एकाच शीर्षकाच्या दोन कविता अनुक्रमे 'चित्रवीणा' (पृ. २०) आणि 'अनुरागिणी' (पृ. २५) मधून घेतलेल्या आहेत. यांपैकी दुसऱ्या कवितेचे शीर्षक (कवितांचा निर्देश करताना संदिग्धता येऊ नये, म्हणून) आम्ही 'दे मज मूळ अरूप निवारा' असे बदलले आहे.

'कोजागरी' ही कविता प्रथम 'चैत्रपुनव' मध्ये (पृ. ५०) आणि नंतर पुन्हा 'अनुरागिणी' मध्येही (पृ. ३७) प्रकाशित झालेली आहे. प्रस्तुत संग्रहात (पृ. ३७) तिचा पाठ 'चैत्रपुनव' मधून घेतलेला आहे.

या संग्रहातील कवितांचे मुद्रण आम्ही आज प्रचलित असलेल्या नव्या शुद्धलेखन-नियमांना अनुसरून केलेले असून, अर्थसंदिग्धता टाळण्यापुरताच क्वचित् जुन्या नियमांचा अवलंब केला आहे.

शक्य तितका साक्षेप राखून आम्ही सिद्ध केलेले हे बोरकरांच्या भक्तिकवितांचे संकलन बोरकरांच्या भक्तांनाच नव्हे, तर सर्वच मराठी काव्यरसिकांना मनापासून आवडेल आणि 'बोरकरांच्या प्रेमकविते'प्रमाणेच ते याही पुस्तकाचे उत्कट स्वागत करतील, असा आम्हांला विश्वास आहे.

हा संग्रह सिद्ध करताना बोरकरांचे आप्त, त्यांच्या कवितेचे दोन रसडोळस चहाते, चित्रकार श्री. सुभाष अवचट आणि मुद्रक श्री. अण्णासाहेब लाटकर या सर्वांनी आत्मीयतेने सहयोग दिला, याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

—प्रकाशक

ग्रंथालय ठाणे
२५५९
२५३४८
काव्य

## अनुक्रम

१. विरोधी भक्ती १
२. प्रसादाची वाट ३
३. ये पुढल्या दाराने ४
४. हरिच्या स्मरभुवनी ५
५. साद ७
६. पंढरीस वाजे घंटा ८
७. मला आपुले म्हणावे ९
८. आळंदीची वाट १०
९. आज तुझ्या घरी आल्ये ११
१०. मी नंदाघरची बावडि ग १२
११. ज्ञानदेव गेले तेव्हा १३
१२. मागणे १४
१३. आता माझ्या मना १५
१४. देवाकारणे १६
१५. सहस्र नामांनी
आळवितो तुला १७
१६. दे मज मूळ अरूप निवारा १८
१७. जेथे जातो तेथे १९
१८. तूच माझा सोयरा २०
१९. मराठीच्या ओव्या २१
२०. तुझे रूप पाहतो २२
२१. पावलो दारी तुझ्या २३
२२. घनवदन २४
२३. आसवांचा वोळे
सौभाग्ये पाऊस २५
२४. रत्नबीजांकुर वाचा २६
२५. कवित्वाहुनी का ? २७
२६. आल्ये माहेरी राहून २८
२७. सुख माझे जाते २९
२८. वीट ३०
२९. शिदोरी ३१
३०. दंश ३२
३१. सोयरिया ३३
३२. आदेश ३४
३३. कोजागरी ३५
३४. नश्वराचा ठावो ३६
३५. फुलांवीण केव्हा कोंदे परिमळु ३७
३६. गवळण ३८
३७. तू विशाल तू कराल ३९
३८. दास डोंगरी राहतो ४०
३९. ग्वाही ४१
४०. घरचिये वांये जोइली बिंदुली ४२
४१. अवसेच्या सायंकाळा ४३
४२. माझ्या कानी बाई
वाजे अलगूज ४४
४३. आतला आतला सये ४५
४४. ज्ञानियाची ओवी
तुक्याचा अभंग ४६
४५. कव घाली जगजेठी ४७
४६. त्याची मज बाई
सोडवेना ओढ ४८
४७. तू मात्र गोविंदा सांडू नको ४९
४८. झालो सुखरूप रूपोत्सवी ५०
४९. शारदेचे वारे संचारले ५१

५०. आपुले स्वरूप मोख रया ५२
५१. सावळ्या विठ्ठला ५३
५२. तया नमो ५४
५३. श्रीक्षेत्र औदुंबर ५५
५४. आत्मकथन ५८
५५. अनृणी गोपाळा केले मज ५९
५६. अंतर्बाह्य आता आनंदकल्लोळ ६०
५७. प्रकाशाचे शब्द ६१
५८. नामरूपावीण हरी ६२
५९. तुझा प्रसाद अद्‌भुत ६३
६०. तुझी ग्यानबाची मेख ६४
६१. शेखींची पहाट वाट पाहे ६५
६२. तुझा घाव ६६
६३. भेटले माहेर ६७
६४. पांडुरंग ६८
६५. सांगता ६९
६६. विठ्ठलाचे लग्न ७०
६७. नाते ७१
६८. अंगी अवसर तोवरी ईश्वर ७२
६९. अभंग तो जाणा ७३
७०. माझी येथेच पंढरी ७४
७१. अद्वितीयपण ७५
७२. ज्ञानदेवी माझी ७६
७३. श्रीदत्ता ! ७७
७४. न करी पस्तावा ७८
७५. आठवा जिवी रघुराणा ७९
७६. ज्योत जो सारून झाडी ८०
७७. हेही नसे थोडे आयुष्यान्ती ८१
७८. विझवून दीप सारे ८२
७९. देव नाही दूर ८३
८०. गीत तुझे गाता गाता ८४
८१. तमःस्तोत्र ८५
८२. ईशावास्योपनिषद् ८७
८३. भज गोविन्दम् ८९

# कैवल्याचे झाड

बा० भ० बोरकर

ज्ञानदेवी माझी धुळाक्षर पाटी
तिची ओवी ओठी गोडावली.
वाचता पोचलो अर्थाच्या पल्याड
आढळले झाड कैवल्याचे.

## विरोधी भक्ती

निष्ठुर किति हृषिकेशी ? रे तू

जपता वरि वरि
येशि लपुनि घरि
गुपिते चोरुनि नेशी रे तू

दोष अमित तव
गणिता मम जिव
हलके चित्त हरीसी रे तू

तुजशि अबोला
धरिता मजला
भलती जवळिक करिशी रे तू

ढकलिता तुशी
अधिक बिलगशी
शिथिल तनू ही करिसी रे तू

दुराविता तुज
सुस्वर हितगुज
घालुनि ओढुनि घेशी रे तू

तुझ्यावरुनि मन
विसरविता क्षण
अधिकचि घरचा होशी रे तू

तुला चुकवुनी
रमता स्नानी
लुगडे चोरुनि नेशी रे तू

दार लाविता
तुला अनंता
तवपणि मंदिर भरसी रे तू

दीप शमविता
नयनहि मिटिता
मनी प्रकाशुनि हससी रे तू

पणजी, २७-९-३२

## प्रसादाची वाट

धाड देवा ऐशा    संकटांच्या कोटी
होवो ताटातुटी    दांभिकांची.

कळतील कोण    सोयरे सज्जन
तुझी प्रेमखूण    बाणूनिया.

संकटांची सुरी    लागता जिव्हारी
अमृताची झरी    पोटी झरे.

कळे मज जीवी    कोठे तुझा वास
वाटती सायास    निर्माल्ये गा.

वार घेता वाटे    दिव्य हे शरीर
तुझेच मंदिर    अनंता रे.

करितो मी तेथे    भावे झाडलोट
प्रसादाची वाट    पहातसे.

बोरी, ८-५-३४

ग्रंथसंग्रहालय ठाणे
क्र. ...........

## ये पुढल्या दाराने

ये पुढल्या दाराने। ये रे हरि
ये पुढल्या दाराने.

धीट जाहले मूर्ख मतलबी जगताच्या माराने.

राखाया मुखदक्षण त्याचे टाकियले नवऱ्याने.

देह आणि मन सख्या उजळले रात्रंदिन अपमाने.

जगास कथु दे मला तुझी मी निर्भय कंठरवाने.

दयिता तव जरि जगभर श्रीहरि करि तव मज अधराने.

ये ये हासत सुरतवसंता ! फुलव तनूची राने.

आनंदीआनंद करू मग चिन्मय रसभाराने.

खुशाल जग मग म्हणो मला की विटाळिली जाराने

१९३७

## हरिच्या स्मरभुवनी

सोड सखि ! येते काकुळती
कुंजवनीचे रव रात्रंदिन व्याकुळ मज करिती

आर्जवे करिशिल सांग किती ?
कळते मजला, दिसते सगळे; परि नच अन्य गती.

दूर कर केशरची वाटी
चांदण्यात मी बुडवुनि काढिन अंगाची कांती

ललाटी माझ्या स्वैरपणा
आवळुनी हे केश बांधिता होइल काय उणा ?

रेशमी शालु नको चोळी
मधुचंद्रोदयि बसेन लेवुनि छायांची जाळी

रिते मज येथिल मणिमोती
दाटति आटति अश्रु चार पळ जैसे गणगोती

अमोलिक जरि ते तुज गमती
कालिंदीचे तुषार निळसर घे अंगावरती

नगांचे काढ झणी ओझे
या भाराने दुरावेल मज अंतिम घर माझे

जेधवा हृदयी धरिल हरी
सालंकृत तनुभागा मुकतिल परमामृतलहरी

घालिसी लोभ वृथा इथला
पाय सखे जरि रुतला येथे प्राण तिथे रतला

वराया तनु येवो नवरा
भरोत अनलाने, लवणाने पितरांच्या नजरा

येथले पाश अता तुटले
देहसुखा जे भुलले जग त्या मन माझे विटले

भुले जो केवळ देहसुखा
स्पर्शे का तो शकेल उजळू हृदयातिल अलका ?

असा तुज काय रुचेल सखा ?
जीव हिरावुनि गेला त्याला म्हणशिल का परका ?

हिणव, म्हण अगणित त्या दयिता
अगणित सुमने फुलवि म्हणुनि का हीन गडे सविता ?

नको मज ठेवू गुंतवुनी
लग्नघटीने ठरेन जारिण क्रूर न हो सजणी.

देइ सखि ! देई कान जरा
प्रतालपाशांपरि रव येती न्याया मजसि घरा

लाजरे जळ का तव नयनी ?
चल, पळ जाऊ सखे ! विसावू हरिच्या स्मरभुवनी

कैंपे, ४-११-४१

## साद

एकच माझा साद । ऐक प्रभु, एकच माझा साद
पचूं न देई मला कधीही इवलासाहि प्रमाद.

स्वार्थे माझे मिटता लोचन
घाल त्यांत अविलंबे अंजन
मोहि गुंतता जरा कुठे मन मागे लाव प्रवाद.

परदु:खावर शिजले जे सुख
विटाळले जरि तेणे हे मुख
या हृदयांतुनि त्या दु:खाचे उठवी शत पडसाद.

ठेच अचानक लाव पदांला
खोक पडू दे अभिमानाला
पाज यशाची चढता मजला चढला जरि उन्माद.

कलेतुनी घसरता विलासी
अथवा मुक्तत्वांतुनि दास्यी
आग लावुनी आत्मसुखाला धुमसत ठेव विषाद.

निष्ठा जरि मम दुबळी झाली
खचवी भू झणि चरणांखाली
विकल करी वरवंचित प्राणा कोंडुनि अंतर्नाद.

विश्वनाट्यविकसनी तुझ्या या
रंगत मजला हवे फुलाया
दयामया! कविपति! निजनियमा न करी मज अपवाद.

पापासरशी देउनि शापा
सन्मार्गी मज लावी बापा!
जाणतसे-मी तुझ्या घरी प्रभु! शासन हाहि प्रसाद.

बेळगाव, १५-३-४५

## पंढरीस वाजे घंटा

पंढरीस वाजे घंटा पांडुरंग झाला जागा
झाडा मागाया उठल्या गोदा भीमा चंद्रभागा

भटा पंड्या बडव्यांनो डोळे उघडून बघा
हात कटीचे हालती राग आला पांडुरंगा

देव भावाचा भुकेला त्यास काय दिले सांगा
लाख मारुनी उपाशी काय ताटांचिया रांगा ?

देव दीन-दुबळ्यांचा डाग कसे त्यांच्या अंगा ?
दारे लावलीत कशी भंगी धेड म्हार मांगां ?

काय काजळ फासिले तुक्या-चोख्याच्या अभंगां
विटाळिली करंट्यांनो ! काय ज्ञानयाची गंगा ?

प्राण इरेला टाकून पांडुरंग रागे उगा
रडा रडा पश्चात्तापे दीनां आलिंगाया लागा

न्हात न्हात आसवांनी जोडा तुटलेला धागा
महारांच्या महाराष्ट्रीं लावा ब्रह्मत्वाच्या बागा

दारे मोकळून सारी सानथोरां करा जागा
भरा आषाढी कार्तिकी लाजवा हो यज्ञयागा

मुंबई, ३०-३-४७

## मला आपुले म्हणावे

स्नेहे तव जळत प्रभो, उजळतो स्वभावे
हरुनि दुरित सकळ मला आपुले म्हणावे

भोगातुनि मथुनि त्याग
त्यागातुनि कनक राग
रुधिरातुनि चिन्मय पय सतत पाझरावे

या मंगल चांदण्यात
सुख तुजला डुंबण्यात
उधळित निज रंग निळा त्यात तू नहावे

तवपणी हे माझेपण
वितळुनि हिमसम कणकण
लोचनि तव होउनि जळ विश्व मी पहावे

बनुनी आनंद-बिंदु
आकळूनि विश्वसिंधु
धुंदीतच दीनबंधु मी तुझ्या रहावे

सरुनि सकळ द्वैतपणा
नटवुनि जीवन-मरणा
होउनि निःश्वास तुझा नसुनि मी असावे

मुंबई, २०-१२-४८

## आळंदीची वाट

झाली भगवी दारापुढची आळंदीची वाट
आली सिंचित मृदुल धुळीवर दहिवर गार पहाट

खडखड किणकिण ध्वनि गाड्यांचे गमले टाळमृदंग
अंगि जागले भागवतांचे ओव्या आणि अभंग

किलबिल पक्ष्यांचीही नकळत मिसळत गेली त्यात
पूर्वेवरचे सोने वितळत ओघळले हृदयात

पुढती भगवद्‌गीता गमली यज्ञकमल नयनांस
अनुवादातिल तिन्ही विभूती बसल्या कोंडुनि श्वास

मुनी विनोबा, कवि ज्ञानेश्वर, योगी मोहनदास
त्रिविध त्यांचिया मुद्रांमधुनी प्यालो ब्रह्मविलास

धालो, आलो भानावरती समोर निद्रित बाळ
दिसले, गमले ब्रह्मसनातन सहजसुलभ वेल्हाळ

करांगुली रवि फिरवित होता त्याच्या कुरळांतून
शांतीवरचे कांचन पाहुन गेलो मी भुरळून

सुकृत फळले फळली माझी आळंदीची वाट
आज अमृते सहज पाहली माझी सोनपहाट

पुणे, २०-११-४९

## आज तुझ्या घरि आल्ये

आज तुझ्या घरि आल्ये

लाज जगाची सख्या तुझ्यास्तव कोळुनिया मी प्याल्ये
सोडुनि सासर, मोडुनिया घर, तोडुनि पाश निघाल्ये

लाथाडुन धन आल्ये धावुन, सांडुनि पोरेबाळे
घरबुडवी मी, कुळबुडवी मी, माझे दैव निराळे

तू रिघता उरि, पाय नुरे घरि, सौख्यच होय विखाळे
सुटली ही तड, दूर तीहि कड, नदी मधेच उमाळे

खुशाल दे दडि, मी दिधली उडि, सावर वा कर काळे
पणास लावुन तुझे थोरपण थोर तुझ्याहुन झाल्ये

पुणे, ६-१०-५०

## मी नंदाघरची बावडि ग

नंदाघरची बावडि ग, मी नंदाघरची बावडि ग
दिसुनी क्षणभर श्याम मनोहर त्यासम झाल्ये लालडि ग

अष्टांगांनीं पाझरले मी
व्योमींचे रस आले रोमी
मातीमधुनी स्रवुनी साखर झाल्ये वेडी भाबडि ग

गाय पाडसाविण पान्हेली
तशी भरूनहि मी तान्हेली
तुमच्या जलभरणाविण तृष्णा गोड असुनिही कोरडि ग

घाली रवि सोन्याची लेणी
चंद्र विणी मोत्यांनी वेणी
लावी उटणी पवन तरीही न पुरे माझी आवडि ग

घेण्यातिल सुख कळले बाई !
देण्यातिल : त्या मितीच नाही ! !
तुमच्या कलशांसंगे भरती माझ्या जीवन-कावडि ग

घट तुमचे ते रिघता पोटी
दुवा सुखे पुटपुटल्ये ओठी
प्रीतीची गत अशीच, उलटी आणिक बोली बोबडि ग

करुनी करुणा पुरवा तृष्णा
मिळवा तुमच्या उरिच्या कृष्णा
कुब्जेपरि होईन उजू, जरि आठ ठिकाणी वाकडि ग

युगायुगांची मी ग गोपी
पडल्ये सापडल्ये या कूपी
कुंजवनातिल तृणातृणाशी घाला माझी सांगडि ग

पुणे, ११-१-५१

## ज्ञानदेव गेले तेव्हा

ज्ञानदेव गेले तेव्हा कोसळली भिंत
वेद झाले रानभरी गोंधळले संत

ज्ञानदेव गेले तेव्हा आटे इंद्रायणी
मराठीच्या वडातळी जळू लागे पाणी

ज्ञानदेव गेले तेव्हा ढळला निवृत्ती
आसवांच्या डोही झाली विझू विझू ज्योती

ज्ञानदेव गेले तेव्हा तडा बिटे गेला
बापरखुमादेवीवरू कटीत वाकला

ज्ञानदेव गेले तेव्हा बापुडला नामा
लगोपाठ भावंडे ती गेली निजधामा

माझ्या ज्ञानराजा ! ते रे कळो आले आज
भर दुपारी ही तशी झाली तीनसांज

तेव्हाच्यासारखा पुन्हा बावला मोगरा
भुईभर झाल्या कळ्या तुटला आसरा

इथे आळंदीत आता ऊर मात्र फाटे
पंढरीच्या वाटेतही बाभळीचे काटे

कळ्यांचाहि वास जिवा जाहलासे फास
एकाकी प्रवास आता उदास उदास

पुणे, २८-३-५७

## मागणे

माझे थकले मागणे तुझे सरेना रे दान
गिमामागून अमाप तुझे पिके समाधान

दिसा वरुषे चांदणे स्वर्ग रात्रीचा आंदण
दाही दिशांच्या तीर्थांनी माझा तुडुंबे रांजण

आता खुंटली रे तृष्णा माझे कुंठले मागणे
मीच झालो तुझ्या हाती तुझे लाडके खेळणे

तुझे माझे दयासिंधो जगावेगळाले नाते
तुझ्या माझ्या जिव्हाळ्यात उभे त्रैलोक्यच न्हाते

माझ्या मागण्याहुनी रे तुझे देणेच शहाणे
'तुझे-माझे' हेहि आता फक्त शब्दांचे बहाणे

६-१२-५९

## आता माझ्या मना....

आता माझ्या मना पाही मुरडोनी
येथे रडे कोणी आयकेना

आसवांची बूज आहे रे माहेरी
त्यांचे या बाजारी काय काम ?

येथे जखमांना झोंबतात माशा
अशांचा तमाशा जीवघेणा

सोसल्याचे जेथे आहे समाधान
ते तुझे निधान बाही, लाही

१२-१-६०

## देवाकारणे

देवाकारणे कुढावे देवाकारणे रडावे
देव जोडावा म्हणून स्नेह जाळीत जागावे

देव खावा, देव प्यावा, देव दुःखींही भोगावा
भाव होता अनावर देव सुखावेगीं गावा

देव गाता देवीं न्हाता धारा ओसंडाव्या नेत्रीं
देव दाटावा साठावा शुद्ध स्फटिकाच्या गात्रीं

देव अनाम अरूप असा नावारूपा यावा
काचेमधील ज्योतशी देव देहीं प्रगटावा

२२-१-६०

## सहस्र नामांनी आळवितो तुला

सहस्र नामांनी आळवितो तुला
तयांना परंतु अतीत तू
सरूप असून अरूपाची खाणी
मुळी न मावशी मतीत तू

कधी रुसव्याने कधी विकल्पाने
शस्त्रे जीव जासी चिरीत तू
हसून कधी वा कुशल पुसून
प्राणीं त्राण येसी भरीत तू

मन होता शिळा वर्षूनिया हर्षे
खेळसी जळाचे ललीत तू
तेच होता पण भिजूनिया काला
सृष्टी पेरिसी त्या मळीत तू

जेथे जातो तेथे नित्य सांगाताने
दुराव्यातही गे प्रतीत तू
मोकळेपणाची रेघ न मोडिता
आवळिसी मला मिठीत तू

१८-७-६०

## दे मज मूळ अरूप निवारा

जळण्याचे बळ तूच दिले रे दे आता विझण्याचे
कणकण फुलण्याचे बळ दिधले तसेच दे झिजण्याचे
आकाशासम धुंद बरसलो रचित दिनान्त दिगंती
माध्यान्हासम क्षारोदधि मज पिउ दे शांत निवान्ती
मत्त चांदणे प्यालो त्यापरि घनतम गिळु दे आता
अगणित नक्षत्रांच्या भारे जड होई तों माथा
धुवांधार मी प्रपात झालो जैसा लक्ष स्वरांचा
जाउनि उगमी मेदू दे मज स्थिर हिमगिरि मौनाचा
आनंदांकुर होउनि जैसा आलो रूपाकारा
सुटुनी त्यातुन घेऊ दे मज मूळ अरूप निवारा

१६-१०-६१

## जेथे जातो तेथे

जेथे जातो तेथे मी माझा सांगाती
पुढे आणि पाठी मीच माझ्या
मीच माझी वाट मीच माझा दिवा
हिऱ्याचा ताजवा मीच माझा
मीच माझी रूपे पाहतो पाण्यात
आणितो गाण्यांत मीच त्यांना
मीच मला कधी हासडितो शिव्या
कधी गातो ओव्या मीच मला
अशी माझी नित्य चाले मम पूजा
लोकी माझ्या ध्वजा मिरवितो

नाही कधी केली तुझी आठवण
म्हणालास पण "मीच तू रे"

पणजी, १२-८-६२

## तूच माझा सोयरा

तूच माझा सोयरा रे, तूच माझा धायरा
तूच माझे पंख, तैसा तूच माझा पिंजरा
तूच माझा गूढ चारा, चांदण्याचा मेघ तू
आंधळ्या माझ्या जिण्याला, रेखणारी रेघ तू
तूच माझी गीतवाणी, तूच माझी रे गती
अन् विसावा तूच माझा, तूच माझी शाश्वती
पिंजऱ्याचे दारही तू, तूच मुक्तीची घटी
तूच माझा जीवघेणा बाण हो रे शेवटी

पणजी, १३-८-६२

## मराठीच्या ओव्या

दूध आईचे आटता तिच्या हाके धावलीस
माय होऊनिया मला वेळोवेळी पावलीस
उचलुनि ओटीपोटी सुखे लाविलेसे उरा
पान्हा पोसणारा तुझा झाला अमृताचा झरा
तुझ्या ज्ञानियाने मला कटीखांदी खेळविले
प्रकाशाच्या आकाशात उंच फेकून झेलिले
आणि भोळ्या नामयाने तीर्थे आणिली अंगणी
कडे घेउनी पंढरे गेली आषाढीला जनी
तेथे पुंडलिकामुखे तिने देवविला पाठ :
" होई पांगळ्या आईची दिव्य पुढाराची वाट."
तुका वाटेत भेटला धुंद इंद्रायणीथडी
मला खांदी घेऊनिया त्याने टाकियली उडी
दोन्ही हाती आली तेव्हा त्याच्या अभंगांची पाने
पांग फेडावया तुझे, शब्द-शब्द झाला लेणे
तृप्त होऊनी बोलसी, " माझ्या लाडक्या सोनारा
माझ्या बहिणीबाईच्या आता सावर संसारा."
तुझ्या अनुज्ञेप्रमाणे नवे घडवितो घाट
तुमच्या ग भेटीसाठी नवी रेखाटितो वाट

तुक्या-ज्ञान्याला छळिले तेच पण देती शिव्या
त्यांचा विसर पडाया गातो अशा तुझ्या ओव्या

पणजी, १६-३-६३

## तुझे रूप पाहतो

हात पांघरून आज सर्व साहतो
तुझे रूप पाहतो

एक-एक पाश तुटे
देहातुन जीव सुटे
प्राणांतुन स्रोत फुटे : त्यात नाहतो

मूक रूखसा बनून
सहज चाललो झडून
सम गणून वाव-ऊन अचल राहतो

दाहातहि गंधवाह
भोगितो तुझा प्रवाह
ऋतुवर ! तव स्पर्शलाह हृदयि होय तो

पणजी, २४-३-६४

## पावलो दारी तुझ्या

पावलो दारी तुझ्या केव्हा कसा अन् कोठुनी
नाकळे करुणा कशी काव्यांत आली दाटुनी
घेरुनी मोही मला दिधल्या कितीतरि यातना
त्यांतल्या ज्वाळांत तू पण जाळिली मम वासना
दुःख ते सुख मानुनी जरि याचिले नच तू दिले
ही व्यथा सुखरूप अक्षय; मृत्युचे सल संपले
स्वार्थ साधायास जाता घातला तू मोडता
सोडिता झालास तू सर्वार्थ माझी सांगता।
सांगती न कधी कुणा हाकेविणे तू पावसी
मात्र तू शोधाविणे समयी सदा मज भेटसी
आपुले नाते असे वर्णावयास जमेच ना
मी कसाहि असो तुला मजवाचुनी करमेच ना

२५-७-६४

## घनवदन

करि गहन हृदयदोहन गे
घनवदन मदनमोहन गे

तो दूर सखे, मी धावा
तो सूर सखे, मी पावा
रति मी, तो रससाजण गे
घनवदन मदनमोहन गे

तो नटनायक स्वच्छंदी
मी अटकेतिल गृहबंदी
परि करि घर क्रीडांगण गे
घनवदन मदनमोहन गे

तो कदंब, मी कालिंदी
मी विषण्ण, तो आनंदी
परि चिरसुख दे आंदण गे
घनवदन मदनमोहन गे

जरि वन मी घनराईंचें
मज भरते ये जाईंचे
मग उधळी हरिचंदन गे
घनवदन मदनमोहन गे

मी सुम जरि कोमलदेही
तो त्यातिल गंध विदेही
मरण क्षण संजीवन गे
घनवदन मदनमोहन गे

पणजी, १९६४

## आसवांचा वोळे सौभाग्ये पाऊस

आसवांचा वोळे सौभाग्ये पाऊस
धन्य तो दिवस सार्थकाचा

अंतरांत उठे झळाळून वीज
अनाहत-बीज मोड घेते

अंधारात होतो अदृष्टाचा पेरा
संचिताला फेरा घालूनिया

मातीला लागती आकाश-डोहळे
शब्दांत सोहळे प्रकाशाचे

अनायास होतो माझियावेगळा
मरून मोकळा चिरंजीव

पणजी, ५-३-६६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५८
दा. क्र. २५३०८
काव्य जाणव
ग्रं० सारा (स्थळ प्रत)

## रत्नबीजांकुर वाचा

रत्नबीजांकुर वाचा । विये प्रकाशाच्या ऋचा
ऐसे करी नारायणा । आल्या उजवून वेणा
तूच रुजोनिया पोटी । घेसी अवतार ओठी
तरी का हा अटकाव । माझा पाहतोस ठाव ?

पणजी, २१-४-६६

## कवित्वाहुनी का?

कवित्वाहुनी का कवी तो निराळा
भोगितो सोहळा तोच जाणे

मुरलीवाचुन काय मुरलीधर
जाहला गोचर स्त्रियां पोरां?

विश्वीं विश्वंभर मजला फावला
पावला पावला भेट देतो

साऱ्या इंद्रियांची फेडितो पारणी
नाना लाघवांनी खेव देतो

२२-४-६६

## आल्ये माहेरी राहून

आल्ये माहेरी राहून । घर गेले तों वाहून
नाही दादल्याचा पत्ता । माती झाली मालमत्ता
पोरे गेली बारा वाटा । खुल्या ललाटाच्या लाटा
झाल्ये एकाएकी सडी । वीज आकाशाएवढी
घरामाहेराचे लळे । आता कवेत मोकळे

पणजी, २५-४-६६

## सुख माझे जाते

सुख माझे जाते चरावया रानी,
एकान्ती विराणी दु:ख गाते :

सुराच्या त्या भारे भांबावते सुख,
दु:खाचे कौतुक काय सांगू ?

व्याकुळल्या सुखा स्फटिकाची कळा,
दु:खाला उजाळा पारजाचा.

युतीने तयांचा जिणेच आरसा :
बिंबे वेडापिसा जीव माझा.

एकाचा मी बहु तुझ्याचसारखा :
निर्मून पारखा निर्मितीला.

पणजी, ५-७-६६

# वीट

तुक्याच्या पायीची व्हाया जिने वीट
केली पायपीट चौऱ्याशीची;
तयाचा संसार करावया गोड
हातांपायां फोड येऊ दिले;
पोचवाया त्याच्या भुकेला भाकर
काट्यांचे डोंगर पालाणिले;
न चुकावी त्याची पंढरीची बारी
म्हणून वोसरी नोलांडिली;
लावुनिया फाळी वाढिली मावंदी;
तुष्टविली मांदी वैष्णवांची;
मांडिला त्यासाठी देवाशीही दावा,
वेळी त्याची आवा उद्धरिली;
आपटिली पोरे, आदळिला माथा,
परी त्याचा गाथा सांभाळिला;
सार्थक होऊन तुक्याच्या जन्माचे
विमान देवाचे आले दारी;
असून गर्भार पाचां महिन्यांची
गाभण म्हशीची आई व्हाया
आलिये मुक्तीला लाविले माघारी :
तुक्याहुनी थोरी जिजाऊची.

डोळ्यांपुढे आहे ताजा तो प्रसंग
रडे पांडुरंग ढसाढसा.

पणजी, १३-९-६६

## शिदोरी

पेर माझ्या लेका संचित रगड
खाजन मरड न म्हणता;

ओपलेला दाणा पावे नारायणा
अभंग धारणा असो द्यावी;

नेणो कवणाच्या भुकेसाठी धन्य
देवाचा पर्जन्य ओसंडतो;

बुडता खाजन मरड तारिते
खात्रीचे मारिते अभाविकां;

तुमचा जी ! असा घेऊन वारसा
शिवरिला पसा गेलो तेथे :

शेताविणे भात ताजा घरोघरी
वाटेत शिदोरी जाता येता

पणजी, १३-९-६६

## दंश

डसला मजला निळा भ्रमर सखि, चढे निळी कावीळ :
डोळ्यांमधले काजळदेखिल झाले गे घननीळ.

निळे कावळे, निळे पारवे,
निळी गोरवे, निळी तारवे,
निळे भुवनवन, निळे गगनघन, निळाच सिंधु सलील.

निळावले मन, निळावले तन,
निळावले नवनीत घटातुन,
निळ्या वेळुंतिल शीळ निळी सखि, निळा उरातिल पीळ.

निळ्या निळ्या प्राणांतिल ज्योती,
निळी निळी डोळ्यांतिल मोती,
घननीळाच्या निळ्या गालिचा निळा निळा मी तीळ.

पणजी, १५-९-६६

## सोयरिया

योगियांच्या राया जन्ममृत्युंजया
तप्तां आर्तांचिया सोयरिया

नाम तुझे कानी वाणी जिवींप्राणीं
बाळिवेपासोनी बळावली

मुसावून ध्यास आला रसत्वास
सुकृत फणस पिको आला

चेतवली जाग पायां लागे माग
कातळीं तडाग आतुडला

याच वडाछाये पुण्यकर्मोपाये
ओलांडून माये मग्न झालो

स्थिरावली दिठी तुझी गैबभेटी
मीनली त्रिपुटी भृकुटीत

याचसाठी येणे करावया पेणे
जन्माचे पारणे फेडावया

७-९-६७

## आदेश

सृजनाच्या आधारशिलेवर
पाय रोवुनी अचल रहा;
अश्रद्धेचा कलह माजता
दिगंबराची शान पहा;

अंगातुन अंगार पेटता
ज्योत दिसे तों मोज दहा :
त्या ज्योतीचे कढ गिळुनी तू
चिरकरुणेने द्रवुनि वहा;

जग होता हे वन्ही हो तू
दशधारांची गुप्त गुहा :
पाणी होऊन मुक्ता गाते
तेच सांगती चार-सहा...

पणजी, २४-९-६७

## कोजागरी

अजाणता चित्त जाणितले तुझे
तेणे माझे ओझे फूल झाले

लाघवाने तुझ्या चाकाटली दिठी
आसक्तीची मिठी सैल झाली

जीवीं गोडावला स्वरूपीचा रस
इंद्रियां पायस जाहला तो

उदेजला चंद्र अंतरी बाहेरी
सर्वांगी साजिरी कोजागरी

तुडंबल्या पात्रीं कोवळाले दिवे
त्यांत तुझ्यासवे विसावलो

पणजी, १७-१०-६७

## नश्वराचा ठावो

नश्वराचा ठावो । ईश्वर पहा वो
जीवनीं या लावो । नाहीं दुजा

जावया न लगे । तीर्थां वनांतरा
सद्ग्रंथसंभारा । तत्त्वचर्चे

संसारवृक्षाच्या । बैसुनिया छाये
मूळ त्याचे पाहे । निजांतरीं

तेथल्या ऊर्मीचा । सोलिता वो कांदा
भेटे मूलबंधा । शून्यत्वीं तो

त्याचिया संधानीं । समाधि सहज
वृक्ष आणि बीज । एकावती

नैश्वर्यीं नित्याचा । ऐश्वर्यविलास
जिणे अनायास । रासक्रीडा

पणजी, ८-१-६८

## फुलांवीण केव्हा कोंदे परिमळु

फुलांवीण केव्हा । कोंदे परिमळु
मंद अळुमाळु भुलावणा

दिवसाउजेडीं । अंधार घे कवे
काजव्यांचे थवे । रोमरंध्रीं

तरंगावाचोनी । अंतरी संवाद
केव्हा मंद्रनाद । तंतध्वनि

मिटल्या लोचनी । झळाळ कमळे
निळे वा उजाळे । तारांगण

पाचपावलीची । द्रुमावली ओली
कधी थंड तळी । पारजाची

आरुणी केशरी । कधी रत्नजाळ
कांचनाचे व्याळ । वेळणारे

कधी अष्टमेंदु । कधी पूर्णिमेंदु
आपाद आनंदु । विद्युन्नट

पाझरतां प्राणीं । अमृताचे स्रव
नागिणीसी चव । वेध लावी

गगनींचे अभ्र । तैसे हे शरीर
उद्गमाभीतर । विरो लागे

लाघवाचे ऐसे । लावुनिया लळे
का रे जन्मवेळे । उजविसी ?

नागेशी, १२-१-६८

## गवळण

गवळण आली : भाळी चंद्रबिंब ल्याली :
निळ्या दिवाळीने मला भुलावण झाली...

हंबरल्या धेनू तोंच, अंबरली वेणू ,
कस्तुरीने न्हाला पेटलेला अणूरेणू.

यमुना नि:शंक : गळे कालियाचा डंख,
मयूरल्या प्राणा आले गगनाचे पंख.

भुलावण घालीतच गवळण आली,
गोविंदून काया अंती गोविंदच झाली.

पणजी, २३-१-६८

# तू विशाल तू कराल

तू विशाल तू कराल तू विदारणारा :
स्तंभ फोडुनी क्षणी ऋतास तारणारा.

तू कृतांतसिंह हिंस्र, सृष्टिचा कृपाळू :
दैत्यदालनीं युगान्तकारि लोकपाळू.

फार माजले असत्य, अग्निजिव्ह पाणी,
फाटली क्षमा, अमाप आज रुद्रवाणी.

आणि भग्न भानुबिंब ओकिते निखारा
या अशा क्षणी प्रभो ! तुझाच रे निवारा.

जे लहान त्या महान ये करावयाला,
गर्भनिद्र अर्भका उरी धरावयाला.

पणजी, २४-१-६८

## दास डोंगरी राहतो

दास डोंगरी राहतो,
सातां समुद्रां बाहतो;
घोंगावून लक्ष वारे
दुर्ग दुर्ग हादरतो.

दास विस्तवी राहतो,
मेघ होऊनी वाहतो :
खडपांत तळपांत
बीजांकुरी पालवतो.

दास अंधारी राहतो,
ब्रह्मप्रकाश पाहतो;
विजेसारखा पेटून
भुतांसमंधां भोवतो

दास एकांती राहतो,
चिंता विश्वाची वाहतो,
त्याच्यापाशी जो जो जागा
त्याच्या हाकेला पावतो.

पणजी, ९-५-६८

## ग्वाही

भाव झोंबला जिव्हारी जागलास तू देव्हारी
येथे बैसल्या ठायीच माझी पंढरीची वारी

घंटा निनादली कानी मंत्र मोहरली वाणी
ओसंडले तुझ्या पायी माझ्या अहंतेचे पाणी

डोळां पुंजाळल्या ज्योती पंचप्राणीं पंचारती
माझ्या आसवांच्या माळा तुझ्या गळ्यात शोभती

अष्ट सात्त्विक भावांनी रोमरंध्र कोंदाटणी
तुझ्या पूजेत सर्वेशा सर्व तृष्णांची आटणी

आता मागायाचे काही प्रभो उरलेच नाही
नाभीतून सुटे गंध श्वासोच्छ्वासी तुझी ग्वाही

१४-९-६९

## घरचिये बांये जोइली बिंदुली

घरचिये बांये । जोइली बिंदुली
ओंजळिये संचली । यमुना गे माय

प्याल्ये तशी धाल्ये । गवळण जाल्ये
साखरेचे आळे । मन खिरले गे माय

पावले पावलीं । तेथे राने पाल्हवली
सुगंध-साउली । फळे लवली गे माय

जाले दशनाद रावे । लक्ष निनादले पावे
सुख जाणिवे न मावे । ते मज फावे गे माय

मिटता नयनु । दिठी मुसावला घनु
पोटी देवकीनंदनु । मज झोंबला गे माय

नेत्रांविण चित्रवती । पतीविण पुत्रवती
निळा बाळकृष्ण ओटीं । माझ्या खेळे गे माय

पणजी, २-३-७०

## अवसेच्या सायंकाळा

अवसेच्या सायंकाळा । देखिला मी कान्हो काळा
तोच काजळ-कावळा । मज शिवला गे माय

जागले मी तीन रात्री । न्हाले कालिंदीच्या पात्री
नव्हाळीची चारुगात्री । आता जाले गे मी माय

माथां चवथीची कोर । अंगे कापराची गौर
मज माझा चित्तचोर । वेगी भेटवी गे माय

त्याची पडलिया मिठी । दिठीं मीनलिया दिठी
धन्य कृष्णचंद्रज्योती । झणी होईन मी माय

पणजी, २-३-७०

## माझ्या कानी बाई वाजे अलगुज

माझ्या कानी बाई । वाजे अलगुज
सांगो जाता तुज । गुज सांगता न ये

देखावे ते डोळा । दिसे बाई निळे
सोज्जळे कोवळे । वाचे वानिता न ये

घालावा तो मुखी । लोणियाचा घास
गोरसाचा वास । सये वारिता न ये

हाती घेता माती । होतो तिचा बुका
अशा स्पर्शसुखा । सर लाविता न ये

मागेपुढे वेणु । चोहीकडे धेनु
नंदाचा नंदनु । तरी धरिता न ये

सुखानेही असा । जीव कासावीस
तरी हा परिस । दुरी सारिता न ये

बोरी, १३-९-७०

## आतला आतला सये

आतला आतला सये काळोख मातला
विळखा घातला मज काळियाने

नाग झाला सूळ माझे नासिले गे कूळ
मज माझे मूळ पण गवसले

आटली अवस, मुळीं पेटला दिवस
रत्नांचा पाऊस अंगी ओसंडला

आता माझ्या प्राणा झाला कालियाच कान्ह।
त्रिभुवना पान्हा नेणे झाल्ये कैशी

मुंबई, ३१-१२-७०

## ज्ञानियाची ओवी तुक्याचा अभंग

ज्ञानियाची ओवी तुक्याचा अभंग
चित्ताशी सत्संग शाश्वताचा

खचलियां धीर पोळल्यां गारवा
जाणत्यां गोडवा जाणल्याचा

करील का कधी ऐसे माझी वाणी
पुरवील धणी गांजल्यांची ?

अशा घाये होतो आलो घायकुती
हिंडत हिंपुटी बारा वाटा

देखिला तो कोणी म्हातारा कामाठी
पाठबळा पाटी लाविलेला

बैसला माध्यान्ही रुखातळी श्रांत
वाचीन निवांत जीर्ण पान

कौतुके देखता माझीच कविता
होती त्याच्या हाता गवसली

बिचाऱ्याला झाली खंथीचा चारा
उन्हाळ्यात धारा पाणियाचा

कवीश्वरांनो ! ही तुमचीच कळा
वेल आला फुला सुकताना

२६-४-७२

## कव घाली जगजेठी

जगी कैक झाले कवी :
ज्याला भावे त्याला चवी;
बोल निघाले जे ओठी
नेणे कैसे, कुणासाठी !

फुलीं डवरली वेल,
दिला वारियाने झेल;
रस गोठला हो देठी,
कव घाली जगजेठी.

बोरी, २-५-७४

## त्याची मज बाई सोडवेना ओढ

त्याची मज बाई सोडवेना ओढ;
लाडीगोडी, भीड मोडवेना.

दृष्टीनेच मज बांधिले खांबाला,
प्राण हा काढिला वेणुनादे.

अशी मी संसारी नांदू तरी कशी ?
पार वेडीपिशी जगी ठेल्ये !

ध्याता त्याते माझे विसरले नाव,
शोधू गेल्ये गाव सापडेना.

पारखाया मज पाहिले दर्पणी :
रूपाची रेखणी आढळेना.

असे कसे झाले चेटूक साजणी ?
आता वेणीफणी काय कामा ?

बोरी, २-५-७४

## तू मात्र गोविंदा सांडू नको

नाड्यावरी चाले जशी सोनचेडी
तशी माझी नाडी चालवी तू.

गर्दीच्या आरोळ्या ऐकू नेदी कानीं
किंवा तृप्त ध्वनी टाळियांचे.

दिसो नेदी डोळां प्रकाश वा दिशा,
घेतलेली रेषा सुटो नेदी.

खुर्चीचे खाविंद करू देत सौदा;
तू मात्र गोविंदा सांडू नको.

बोरी, २-५-७४

## झालो सुखरूप रूपोत्सवी

नाही माझी काही कागाळी तक्रार :
सारा माझा भार घेतलासी.

जन्मताच कंठी घातलीस वीणा
तेणे आले गुणा जन्मदोष.

जिवासवे झाला कायेचाही कल्प,
झालो सुखरूप रूपोत्सवी.

घरीच घातली माझ्या बाळ-कानी
आर्त भक्तवाणी उमाळ्याची.

भजनात तुझी मूर्ती होता जिवी
नेणता आसवी न्हाणिली मी.

बोरी, ४-५-७४

## शारदेचे वारे संचारले

वसतीला येता गोसावी, बैरागी
त्यांची सेवा सांगी केली भावे.

दुखावता सले बोललो झाडांशी,
चंद्राशी, फुलांशी, पाखरांशी.

बोलांत दाटले सूर, राग, ताल,
झोंबलेले व्याळ प्रेम व्याले.

धुळाक्षरे झाली साहित्याची दारे,
शारदेचे वारे संचारले.

स्वरी जे जे आले झाले चित्ररूप,
छंदांत अरूप धूप झालो.

बोरी, ४-५-७४

वाचनालय ठाणे
काव्य २५५८ २५३४८

## आपुले स्वरूप मोख रया

पहाट ढाळिते प्रकाशप्राजक्त
माणके मौक्तिके वेच रया

शिळावले पाणी आरशाचे पान
शांतीचे स्तवन वाच रया

अंधाराचे माथी स्फटिकाचा दिवा
शिल्पाचा रेखावा देख रया

वारियाचे घरी गंधाची तोरणे
कवण्या कारणे जाण रया

जागे झाले तृण करी मुका जप
आपुले स्वरूप मोख रया

मडगाव, २९-९-७५

## सावळ्या विठ्ठला

सावळ्या विठ्ठला तुझे सावळेच अंग
सांग कसे गाजे जगी नाम पांडुरंग ?

तुलाच रे नाही कशी लोकी जातपात ?
शिंप्या नाम्याहातचा तू खासी दूधभात.

काढिसी बंक्याचा काटा हाते हळुवार,
दाम्यासाठी नेसी हुंडी होउनी महार.

धर्मभ्रष्ट कसा तुझा सारा व्यवहार ?
कबिराच्या शेल्यामधे होसी जरतार.

विठ्ठला विठ्ठला तू रे सर्वांगी ओवळा,
तरी कसा कर्मठा तू अभ्यंग सोवळा ?

बायकांत पुरुष तू लांबोडा लांबोडा !
नामयाच्या जनीचाहि घालिसी आंबाडा.

वाखाणितो रूप तुका ' सुंदर ते ध्यान '
परी देसी कुब्जेलाही दृढ आलिंगन.

आईपरी पान्हा तुला फुटे लवलाही
म्हणून का तुला बापा म्हणती विठाई ?

बोरी, १७-८-७६

## तया नमो

नमो ऐसा न दिसे कोणी
कोणी दात कोणी लोणी
वेगळा दोन्हीपासोनी । तया नमो

कोणी अरत्राचे अंकिले
कोणी परत्रासी सोकले
द्वयीं अद्वैत देखिले । तया नमो

कोणी धाकासी गेले बळी
कोणी लोभाच्या लागले गळी
दोघांहि जेणे खुडिले मुळीं । तया नमो

कोणी षड्रिपूंचे पांगिले
कोणी जोगड्यांमागे लागले
जेणे षड्रिपु सन्मित्र केले । तया नमो

कोणा सारा संसार भारा
कोणा कारा गृहपुत्रदारा
ज्या मोरा तो नृत्यपिसारा । तया नमो

कोणी कर्दमीचे दर्दुर
कोणी सरोवरीचे जळचर
पूर्णपद्मीचा विरळा भ्रमर । तया नमो

कोणा देव राय-राउळी
कोणा तोचि धन-देउळी
ज्या तो आपुल्या दशांगुळीं । तया नमो

बोरी, १७-९-७७

## श्रीक्षेत्र औदुंबर

अक्षरांमाजि मंत्राक्षर।
तैसे क्षेत्री औदुंबर।
जेथे साक्षात श्रीओंकार।
दत्तगुरु ॥ १ ॥

तो म्या घरीचिया देव्हारी।
देखिला, रेखिला अभ्यंतरी।
बाळपणीच भजनी गजरी।
मनोभावे आळविला ॥ २ ॥

त्याते आळविता ऐसा।
सगुणत्वे भावला मानसा।
जेणे जाहलो अतिरसा।
पाहणा मी ॥ ३ ॥

ओंकाराची लाभली दीक्षा।
शब्दचि जाहला प्रबुद्ध शिक्षा।
ठायीच झालो संसारवृक्षा।
प्रदक्षणा ॥ ४ ॥

जीवनाच्या प्रतिसोपानी।
गुरुरूपे हाता धरूनि।
मज श्रीक्षेत्र अनुशासुनी।
सांभाळिले ॥ ५ ॥

तेथेचि एकदा सुधांशु-अक्षरीं।
निमंत्रिले मज श्रीनिवास-करीं।
संक्रातीच्या साहित्य-अवसरीं।
यावे घरा ॥ ६ ॥

दिनु होता अमृते पाहला ।
औदुंबरे होती कांचनकळा ।
तेव्हा त्याच्या छायेतळा ।
ध्यानस्थ झालो ॥ ७ ॥

तेधवा संकल्प उगवला चित्ती ।
परममंगल येचि क्षिती ।
बाचावी सिद्धसरस्वती ।
श्रीज्ञानदेवी ॥ ८ ॥

तोचि मानूनी प्रमाण ।
सोमवारी घातले आसन ।
जेथे शंकरानंद नारायण ।
आशीर्वचले ॥ ९ ॥

पुण्यपावन इये मठी ।
शांति ध्यानस्थ अतिगोमटी ।
समोर सृष्टी हरित पोपटी ।
पाचु-प्रभा ॥ १० ॥

येथे कृष्णा चंद्रभागा ।
काठी उभा अवधूत जागा ।
अपार जाहल्या अनुरागा ।
वैराग्य आले ॥ ११ ॥

येथे सूर्योदय अति देखणा ।
चैतन्याचा कुशल शिंपणा ।
वट-अश्वत्थीं ऋषिवर खुणा ।
करी जाग्या ॥ १२ ॥

आंगठ्याएवढी पाखरे ।
गाती येथे गंधर्वस्वरे ।
कोकीळ तो डहूळी गहिरे ।
अंतरीचे ॥ १३ ॥

ऐशिया सुंदर आसमंती ।
उमाळे सर्व हृदयश्रीमंती ।
ओवीसवे गाऊ लागती ।
रोमांच सारे ॥ १४ ॥

या स्थानाचा लौकिक थोरु ।
प्राकृताहि लाभे वरु ।
भरोनि जाय जिव्हारु ।
अमृतेसी ॥ १५ ॥

बैसे तेथेचि कल्पतरु ।
वास ये तो चंदन अगरु ।
घ्यावे ते ते श्रीतीर्थ रुचिरु ।
तृप्तिदिणे ॥ १६ ॥

न कळता जे घडले भले ।
ते सर्व आज मोहरा आले ।
श्रीगुरूच्या कृपाबळे ।
देहेचि मोक्ष ॥ १७ ॥

अध्याय मिटता अठरावा ।
सर्व तृष्णांचा निरास व्हावा ।
डोळे मिटता आतला दिवा ।
दिसावा मज ॥ १८ ॥

औदुंबर, १९-४-७९

## आत्मकथन

बत्तिशीं कार्तिकी वद्य चतुर्दशीं
आलो येथे कुशी मुक्ताईच्या

पिता भगवंत अष्टगुणवंत
भावांचा श्रीमंत स्वप्नद्रष्टा

तयांची पुण्याई झाली कृपाछत्र
घर पुण्यक्षेत्र संतपदे

बाळपणातच चोख संतवाणी
तालस्वरी कानी वेल्हाळली

शब्द मज झाले कौस्तुभ कुंडल
ज्यांत दिङ्मंडल ओलावले

त्यांच्याशी खेळता त्यांनी दिले क्षेम
निजगुजवर्म सांगितले

त्यांचिया सांगाते केली पायपीट
त्यांनी माझी वाट रेखाटिली

भाळुनिया वाटे उमाळले शब्द
छंदांचे प्रबंध तेच झाले

आतुडले तेणे अस्त्र परत्र
ज्यांनी विश्ववस्त्र विणिले हे

त्यातच देखिला तयांचा विणारी
तेणे मज उरी आलिंगिले

शब्दी मज त्याचा अहर्निश संग
जाहला अभंग बोलिल्याचा

३-७-७९

## अनृणी गोपाळा केले मज

अनायास फिटे ऐहिकांची आस,
राहिला प्रवास थोडा आता.

चालविला भला सारा योगक्षेम,
दिले स्नेहप्रेम गेलो तेथे.

पोटा आलियांते पुरविले पंख,
आभाळीं निःशंक केले तयां.

घडविली पैक्याविणे तीर्थावळ,
संतकृपाबळ सोपे केले.

शाणिवेवाचून दिधली जाणीव,
तेणे माझा जीव सुखविला.

रणीच्या घावांच्या नुरो दिल्या मावा,
नाही हेवादावा शिवू दिला.

करून घेतले काही लोककाज,
ऐसे केले चोज सुकृताचे.

ठेविले यशात अहंतेवेगळे,
अपेशी राखिले श्रद्धाबळे.

हिशेबावाचून जमविला ताळा,
अनृणी गोपाळा केले मज.

बेती आल्त, ८-७-७९

## अंतर्बाह्य आता आनंदकल्लोळ

आयुष्याची आता झाली उजवण,
येतो तो तो क्षण अमृताचा.

खडे-गोटे मज झाले चिंतामणी,
दिसे ते ते पाणी गंगोदक.

लवे वृक्षवल्ली : कल्पद्रुमावली,
इंद्ररंगावळी मेघमाळा.

वेल्हाळ पाखरे : गंधर्व-किन्नरे,
वाहने वनचरे अमरांची.

जे जे भेटे ते ते दर्पणीचे बिंब :
तुझे प्रतिबिंब लाडेगोडे.

उमटल्या शब्दी नवीन पहाट,
पावलांत वाट माहेराची.

अंतर्बाह्य आता आनंदकल्लोळ,
श्वासी परिमळ कस्तुरीचा.

सुखोत्सवी अशा जीव अनावर :
पिंजऱ्याचे दार उघडावे.

बेती आल्त, ९-७-७९

## प्रकाशाचे शब्द

ओलावती माझ्या मुखी
तुझे प्रकाशाचे शब्द
लख्ख आतल्या विजेने
माझे उजळे प्रारब्ध

पिंडातच उघडतो
तुझ्या ब्रह्मांडाचा गाभा
आनंदाचे ऊर्ध्वतीर्थ
तुला न्हाणी पद्मनाभा

जागे नाभीतला स्पंद
कंठी तोच होतो छंद
भृंग होऊन सेवितो
मी हा माझाच मरंद

चित्त चाकाटून लोपे
वाहे नकळता वाणी
दृष्टीपुढे उचंबळे
फक्त प्रकाशाचे पाणी

३०-८-७९

## नामरूपावीण हरी

नामरूपावीण हरी नटे नामरूपी
अकस्मात भेटे कधी आपुले स्वरूपी

नाही गोरा नाही काळा असा पांडुरंग
रंगातीत अंतरंगी नित्य त्याचा संग

शोधू जाता नाही तोच न शोधिता आहे
लक्ष नेत्र झाकूनही जगत्रय पाहे

अशा सोंगाड्याचा मला जडलासे छंद
आनंदी आनंद तोच गोविंद गोविंद

३-११-७९

## तुझा प्रसाद अद्भुत

रुचे ते ते करी     सारा भार तुझ्यावरी,
जन्मांचा विकला     मी तों तुझाच पांगला.

सोशिले अपार,     तूच घातलेस पार,
दु:खाचे शेवटी     दिठी दिलीस गोमटी.

आळवीन गाथा     वीज पडलिया माथां,
राखेची विभूत     तुझा प्रसाद अद्भुत

पुणे, १५-२-८०

## तुझी ग्यानबाची मेख

जरेसवे व्याधी      हे तों देहाची उपाधी.
आहे मी सचेत      हाही तुझाच संकेत.
भली तुझी कळा :      व्यथा प्रयोगाची शाळा.
अंतरीचे न्यून      घ्यावे विस्तवी लासून.
असे व्हावे चोख      तुझी ग्यानबाची मेख.

पुणे, १५-२-८०

## शेखींची पहाट वाट पाहे

डोळ्यांत प्रकाश पावलापुरता
अंतरीचा दाता देत राहे.

तहानेला वाहे कृपावंत झरा :
पितां नाही जरा शीण काही.

शिंपल्यासारखी स्वये मिटे भूक
यापरते सुख काय आहे ?

चाल तू आपुल्या प्राक्तनाची वाट :
शेखींची पहाट वाट पाहे.

लुइव्हिल, ९-८-८०

## तुझा घाव

तुझ्या घावानेही उठे दिव्य स्फुल्लिंग दीप्तीचा
व्यथेच्याहि तळातून वाहे प्रवाह शक्तीचा

माथां ठेविता डोंगर देसी गिरिधर भुजा
वृथा शिणू कण्हू का मी ? तुला कृपेस ना तुझ्या

दुःखातही वारिसी तू दुजे त्याहुनी दारुण
कशाला मी मापू तुला माझ्या तोकडया सुतानं ?

ज्वाळांतही जाणतो मी तुझे कारुण्य अनंत
तुझ्या घावानेही आहे आज प्रसादे श्रीमंत

पर्वरी आल्त, ३१-१-८१

## भेटले माहेर

विठ्ठल तो बाप माझा
आई रखुमाई
पुंडलीक भाऊ माझा
बहीण भिमाई

संत वैष्णवांचा मेळा
माझा गोतावळा
तेणे माझे जिणे झाले
अमृतसोहळा

संगी कीर्तनाच्या रंगी
ओलावला कंठ
पंढरीचे वाळवंट
ते माझे वैकुंठ

प्रकाश अपार झाला
अंतरी बाहेर
नाचता नाचता मला
भेटले माहेर

बोरी, ३-९-८१

## पांडुरंग

पांडुरंग दाता : पांडुरंग त्राता
अंतीचा नियंता पांडुरंग

दयेचा सागर : मायेचे आगर
आनंदाचे घर पांडुरंग

भक्तीचा ओलावा : दृष्टीचा दिष्टावा
श्रद्धेचा विसावा पांडुरंग

तप्तांचे चंदन : दीप्तांचे इंधन
प्रकाशवर्धन पांडुरंग

अंगसंगे त्याच्या झालो मी नि:संग
देहीच साष्टांग पांडुरंग

पर्वरी आल्त, ८-९-८१

## सांगता

विठ्ठल नाही पंढरीत, विठ्ठल आहे अंतर्हित
त्रिजगत आहे प्रेरित विठ्ठल माझा

विठ्ठल आहे दाही दिशा, उगवी मिटी उषा निशा
विठ्ठल बिलोरी आरशासारखा आहे

विठ्ठलासारिखे नोहावे, त्याच्याकडेच झेपावे
आपुले अरूप पहावे विठ्ठल बिंबीं

विठ्ठल अरूपी गाठिता अवघ्या जन्मांची सार्थता
विठ्ठल निष्ठेची सांगता विठ्ठलीं भोगी

पर्वरी आल्त, ८-९-८१

## विठ्ठलाचे लग्न

मथुरेला मज विठ्ठल गावला
संकेत फावला तुकोबाचा

स्थापिला देव्हारी पूजिला अर्चिला
तरी उदासला भासला तो

एकलीक त्याची सोसवेना झाली
निघाली जिव्हाळी काळजाची

जिवाला लागले रखुमाईचे वेध
केला तिचा शोध तीन वर्षे

अकस्मात हाती आली हरिद्वारी
विठ्ठलाशेजारी उभी केली

हासला विठ्ठल रखुमाई लाजली
माझी दिठी झाली अंतर्पाट

मनाच्या मुहूर्ती लावियेले लग्न
झाले माझे धन्य पौरोहित्य

पर्वरी आल्त, ८-९-८१

## नाते

तुझे असंख्यात हात त्यांतलेच माझे दोन
तुझे असंख्यात पाय त्यांतलेच माझे दोन

तुझे असंख्यात डोळे त्यांतलेच माझे दोन
तुझे असंख्यात ओठ त्यांतलेच माझे दोन

तुझ्या संकल्पाप्रमाणे घडो त्यांची हालचाल
तुझ्या प्रातिभ दीप्तीने माझे उजळो कपाळ

माझ्या पिंडात स्पंदतो तुझा ब्रह्मांडाचा स्पंद
माझ्या प्राणांतून वाहे तुझा आनंद निःस्यंद

सूत्रचालका खेळतो जसा खेळविसी माते
कळा तुझी खुलवावी असे तुझे माझे नाते

पर्वरी आल्त, १५-९-८१

## अंगी अवसर तोवरी ईश्वर

अंगी अवसर तोवरी ईश्वर
एरवी मी नर वैगुण्यांचा

संचारी बोलतो तो जाणा विठ्ठल
अन्य वेळी बोल फोल माझे

स्पर्शें त्याच्या होतो प्रकाशपुतळा
एरवी ओवळा कावळा मी

जे न माझे त्याचा वाहू का मी गर्व
कर्तृत्व ते सर्व विठ्ठलाचे

पर्वरी आल्त, २१-९-८१

## अभंग तो जाणा

अभंग तो जाणा छंदांमाजी राणा
ओवी ते चांगुणा राणी त्याची

प्रतिष्ठिला त्यांनी मराठी देव्हारा
गुह्याचा गाभारा उजळीला

श्लोक झाले खांब आर्या त्या तुळया
दिंड्या साक्या झाल्या पत्रवल्ली

लावणी भावीण पोवाडा पार्पती
ऐकतो श्रीपती ओवियेचा

राई गवळण भिमाई विराणी
कळसाला पाणी कांचनाचे

पर्वरी आल्त, १-१०-८१

## माझी येथेच पंढरी

माझी येथेच पंढरी
विठू भेटे दारी घरी

येतो माणसासारखा
होतो पाठिराखा सखा
काही पडू न दे उणे
धावे प्रसंगाकारणे

घाली उन्हात सावली
वेढी थंडीत कांबळी
धरी छत्र पावसात
करी काळोखीं सोबत

कधी लावितो कानस
माझा पारखितो कस
कधी घालतो विस्तवी
माझी वाढवी थोरवी

त्याच्यामुळे माझे जिणे
चोख सोन्याच्या प्रमाणे

पर्वरी आल्त, २-१०-८१

## अद्वितीयपण

आंगठ्याची सही तशी जगी दुजी नाही
अद्वितीयपण आलो प्रत्येक घेऊन
स्वयंभू अमूप नवे विठ्ठलाचे रूप
तेच जीवेभावे आठां अंगी शृंगारावे

पर्वरी आल्त, ३१-१०-८१

काव्य

## ज्ञानदेवी माझी

ज्ञानदेवी माझी धुळाक्षर पाटी
तिची ओवी ओठी गोडावली

वाचता पोचलो अर्थांच्या पल्याड
आढळले झाड कैवल्याचे

तयाचिये छाये पावलो विसावा
उकलला गोवा चौऱ्यांशीचा

पहाटल्या दिठी ज्ञानराज-भेटी
प्रकाश-कोंदाटी सुखी झालो

पर्वरी आल्त, १-१२-८१

## श्रीदत्ता !

श्रीदत्ता ! तव पादुका स्थिर जिथे
तीर्थे तिथे वोळती
चारी वेद सुणे बनून जवळी
त्यांच्याच रेंगाळती
पृथ्वी होउनि कामधेनु कपिला
त्यांची द्रुती हुंगते
पुण्यक्षेत्र-शताब्दि-शिल्प-कृति ही
कीर्ती तुझी सांगते.

[ साखळीच्या श्रीदत्तमंदिराच्या शताब्दी-स्मारकासाठी
लिहिलेला श्लोक ]

पर्वरी आल्त, ४-२-८२

## न करी पस्तावा

केलिया भल्याचा न करी पस्तावा
जरी घोर चावा कृतघ्नाचा
हाच खरा आहे कसोटीचा क्षण
निज साचपण पारखाया

भगवंते ज्याला दिधले जीवन
तो का तुझ्यावीण होता उणा ?
भक्त काय ठेवी हिशेबाची कीर्द
दंशे नोहे विद्ध कोणत्याही

सायन-मुंबई, १२-३-८२

## आठवा जिवी रघुराणा

हे जीवन सरते जाणा
आठवा जिवी रघुराणा

विस्तार दिसे जो सारा
त्याचाच सचित्र पसारा
हे अविरत ध्यानी आणा
आठवा जिवी रघुराणा

तो सूत्रकळाविद खेळे
म्हणुनीच जगत्रय हाले
त्यावीण गणा न प्रमाणा
आठवा जिवी रघुराणा

तो स्मरता हरते पाप
तो स्मरता सरती ताप
त्याच्याचमुळे सुख प्राणा
आठवा जिवी रघुराणा

घालिता तयावर भार
फुलहलका हा संसार
शीणाविण मिटती तृष्णा
आठवा जिवी रघुराणा

तो आठविता सुख दाटे
बोथटून जाती काटे
नित अतिरस येइ उधाणा
आठवा उरी रघुराणा

पर्वरी आल्त, ९-१-८३

## ज्योत जो सारून झाडी

ज्योत जो सारून झाडी काजळीचा काजवा
त्यास जोखायास आणू कोठला मी ताजवा ?

दर्शने ज्याच्या फुले ही अंतरी दीपावली
आणि गात्री पालवे वासंतवल्ली कोवळी

वाहते विश्रांत जीवी अमृताची निर्झरी
अन् तिच्या पाण्यात खेळे चंद्रम्याची माधुरी

संग त्याचा गंधवाही फुल्ल पद्मासारखा
जीव होतो तत्क्षणी तृष्णांक्षुधांना पारखा

ही प्रतीती लाभता का बोध त्याशी मागसी
मौन दाटे तोच शब्दांमागुती का लागसी ?

ज्ञान जे आकाशसे शब्दांत ते मावेल का ?
एक का आहे कुणी येथे दुज्याच्या सारखा !

पर्वरी आल्त, २५-२-८३

## हेही नसे थोडे आयुष्यान्ती

माझिया अज्ञाना नाही अंतपार
व्यर्थ वय-भार वागविला

निद्रा भय किंवा आहार मैथुन
तद्‌गुज अजून नुमगले

आजन्म ज्या देहे केली मज साथ
तोही नाही नीट ओळखिला

कैसा तो जागवी यातनेचा दाह
उसवी प्रवाह अमृताचा

लागली न त्याची अजून चाहूल
अज्ञानाची भूल ऐसी माझ्या

यासी जो चाळवी गैबी सूत्रधारी
आकळला तरी नेणिला तो

कळे तरी माझे अज्ञान केवढे
हेही नसे थोडे आयुष्यान्ती

मुंबई–दादर, ५-४-८३

## विझवून दीप सारे

विझवून दीप सारे
मी चाललो निजाया
आता अशाश्वताची
उरली मुळी न माया

मी पाहिले तयाचे
वेल्हाळ रंग सारे
तेव्हाच शाश्वताचे
मी हेरिले इशारे

स्वर शब्द वेचलेले
शोषून सर्व प्राणी
आजन्म ओविली मी
त्यांची प्रसन्न गाणी

ध्वनि त्यांतुनी परंतू
कुणि आगळा निघाला
त्यांचाच छंद आता
या लागला जिवाला

खेळून सर्व नाती
उरलो पुन्हा निराळा
लंघून राहिलो मी
माझ्याहि संचिताला

मिळु द्या मला मुळाशी
सारी मिटून दारे
मोकाट वारियांनो !
थोडे मुकाट व्हा रे

पर्वरी-आल्त, २६-७-८३

## देव नाही दूर

देव नाही दूर तुझ्यातच आहे
सांडुनिया ताठा ओणवून पाहे

दुधी दही लोणी लोणियात घृत
तशी वाट पाहे तुझी भगवंत

लावी विरजण आले दही चाळ
लोणियाच्या तळी ठेव थोडा जाळ

तेव्हा तुझ्याहून देव ना निराळा
किती तुला देऊ संतांचा निर्वाळा ?

पर्वरी-आल्त, ७-९-८४

## गीत तुझे गाता गाता

गीत तुझे गाता गाता
मीच गीत झालो
प्रीत तुझी ध्याता ध्याता
मीच प्रीत झालो

रूप तुझे स्मरता स्मरता
चांदण्यात न्हालो
नाम तुझे जपता जपता
मी तुलाच प्यालो

लागलो न भोगांमागे
वा तयांस भ्यालो
हाक जागृतीची येता
त्यांतुनी निघालो

असा धुंद गोसावी मी
ना कुणा कळालो
तरी तुझ्या ज्योति:स्पर्शी
भाळलो मिळालो

ऐस तू खुशाल कुठेही
मी तुडुंब धालो
अविश्रांत हिंडुनि अंती
मी निवांत झालो

पर्वरी-आल्त, ११-३-८४

## तमःस्तोत्र

ॐ नमः श्री भगवन् तमा
प्रकाशजनका पुरुषोत्तमा
तुझिया महिम्या नाही सीमा
उपमा शब्द सर्व थिटे

बापा तुझिया ओटी पोटी
तारामंडले असंख्य कोटी
ज्योतिष्कमळे अति चोखटी
गोमटी लावण्यभांडारे

त्यांचीच जी आदिम ज्योती
अमृत नामे बोलती श्रुती
ती तू पेरून गर्भस्थिती
निवान्ती मज जोजविले

तिजमुळेच उघडिता डोळे
त्यांनी कवळिले ब्रह्मांड सगळे
राहिले जे त्याहिवेगळे
तेहि पाहिले अंतर्दृष्टी

अति पाहून शिणता दिठी
तूच त्याते लाविली ताटी
निजकणवेची घालून मिठी
शीण शेवटी वारिले

ऐसा तू गा दातारु
निजानंदाचे आवारु
मृत्यु होऊनि माझा भारु
सारोद्धारु वाहिलासी

आता दृष्टी जाहली क्षीण
म्हणुनी तुझिया चरणी लीन
आलिंगोनी मज नवीन
सुवर्णदृष्टी दे बापा

जे जे काही पाहीन नवे
ते ते सर्व गाईन भावे
प्रसाद मानून तुझ्याच नावे
सर्वात्मभावे समर्पीन.

पुणे, २४-४-८४

## ईशावास्योपनिषद : मराठी अनुवाद

ईशाने हे वसे सर्व जे काही जगतीं जगत् ।
भोग तू अर्पुनी त्याते कुणाचे न हरी धन ।। १ ।।

शतायुष्य अपेक्षावे येथे कर्मे करीतच ।
येणेच–न दुज्या मार्गे–न कर्म लिंपिते नरा ।। २ ।।

जाती असूर्यलोकात काळोख मिट्ट दाटल्या ।
ये लोकी पावता मृत्यु आत्मया वधितात जे ।। ३ ।।

ठायीच राहून मनास लंघी ।
धावून देवासही ये न गाठू ।
ते धावत्यां तिष्ठत टाकि मागे ।
विभु स्त्रवी त्यातुनिया रसाते ।। ४ ।।

चालते ते, न चालेही; दूर ते, जवळीहि ते ।
अंतरी तेच सर्वांच्या, सर्वांच्या बाह्यतःहि ते ।। ५ ।।

पण जो सर्व भूतांत पाहतो आपुलेपण ।
आपुल्यात तसा त्याते विटेना तो तदा कुणा ।। ६ ।।

आत्म्यातुनीच जाली ही भूते हे जाणिले जये ।
एकत्व-देखण्या त्याते मोह वा शोक कोठला ? ।। ७ ।।

अतीत तो दिव्य अदेह शुद्ध ।
स्नायु व्रणोन्मुक्त अपापविद्ध ।
कवी मनीषी परिभू स्वयंभू ।
सर्वां सदा चालवितो स्वभावे ।। ८ ।।

सोकावले अविद्ये जे रिघती आंधळ्या तमी ।
त्याहुनी घोर काळोखी विद्येतच रत नित्य जे ।। ९ ।।

विद्येने गवसे गा ते अविद्येनेहि आढळे ।
थोरांचे सांगणे ऐसे अंतरी बाणले अम्हां ॥ १० ॥

विद्ये आणि अविद्येने उभयी जो ओळखे तया ।
तरे मृत्यु अविद्येने विद्येने अमृता झटे ॥ ११ ॥

सोकावले अजन्मा जे रिघती आंधळया तमी ।
त्याहुनी घोर काळोखी जन्मातच रत नित्य जे ॥ १२ ॥

जन्माने गवसे गा ते अजन्मानेहि आढळे ।
थोरांचे सांगणे ऐसे अंतरी बाणले अम्हां ॥ १३ ॥

जन्मा आणि अजन्माने उभयी जो ओळखे तया ।
तरे मृत्यु अजन्माने जन्माने अमृता झटे ॥ १४ ॥

आहे सुवर्णपात्राने सत्याचे झाकिले मुख ।
समर्था वारुनी ते तू सत्यधर्मार्थ दाखवी ॥ १५ ॥

आवरी व्यूह रश्मीचा यम, सूर्य प्रजापते ।
तेज तेच तुझे रूप कल्याणतम पाहतो ।
पुरुष तेथे जो तोच मी असे ॥ १६ ॥

हे वैश्वदेवा सृजनज्ञ अग्ने ।
ने राणिवे न्याय्यपथेचि आम्हा ॥
वारी अघाचा विळखा मनाचा ।
काया वाचे नित्य तुला नमस्ते ॥ १७ ॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

## भज गोविन्दम्

श्रीशंकराचार्यांच्या ‘ चर्पटपंजरिका ’
स्तोत्राचा समश्लोकी अनुवाद

भज गोविंदा, भज गोविंदा
गोविंदा भज मूढमना ।
ठरली घटका येता नच ये
टाळाया ती व्याकरणा ।। १ ।।

मूढा, सोड धनाची तृष्णा
सत्यीं स्थिर करि विरतमना ।
लाभे जे निजकर्मे कष्टे
करि त्यातच तोषे क्रमणा ।। २ ।।

स्त्रीच्या नाभिउरोजाकृतिते
बघुनि न होई वश मोहाते ।
ती तर मांसवशेची रीती
वेळोवेळी घोळव चित्ती ।। ३ ।।

कमळदळीचे जळ थरथरते
जीवित तद्वत् चंचल मोठे ।
जडुनी व्याधी गर्वोपाधी
बघ सारे जग खंतच काढी ।। ४ ।।

जोवर पैसा आहे गाठी
तोवर घरची पुढतीपाठी ।
होता पण मग जर्जर काया
शब्दहि नच कुणि वेची वाया ।। ५ ।।

श्वास वसे जोवरती देही
        पूस जरा कुणि घेतो गेही।
तो जाउनि ही पडता काया
        खचित तिचे भय घेते भार्या ॥ ६ ॥

बाळ असे तों खेळीं ओढा
        तरुण असे तों प्रियचि नवोढा।
वृद्ध असे तो संतत चिंता
        न भजे कुणि परमानंदा ॥ ७ ॥

पत्नि कुणाची ? पुत्र कुणाचा ?
        थांग न लागे संसाराचा।
तूंच कुणाचा ? कोठुनि येसी ?
        विवर सख्या येथेच स्वतःशी ॥ ८ ॥

सत्संगाने निःसंगाते
        निःसंगाने निर्मोहाते।
निर्मोहाने निश्चलवृत्ती
        निश्चलतेने जीवन्मुक्ती ॥ ९ ॥

वय ओसरता काम कुठे गा ?
        जळ सुकता स्थळ केवि तडागा ?।
धन मावळता नाती कोठे ?
        गुज आकळता भव तरि कोठे ? ॥ १० ॥

न करी धनजनयौवनगर्वा
        काळ लुटी निमिषातच सर्वा
मायामय सकळहि जाणावे
        उमजुनि ब्रह्मपदात रिघावे ॥ ११ ॥

सांजसकाळी दीस नि राती
शिशिर वसंतहि येती जाती।
काळ बागडे, जाते आयू
तरिहि सुटेना आशा-वायू ॥ १२ ॥

धनकांतेची का रे चिंता ?
भ्रांता ! का तुज नाहि नियंता ?
त्रिजगति सत्संगतिविण एका
भवतरणास्तव न दुजी नौका ॥ १३ ॥

ठेवुनि, तासुनि, उपटुनि केशां
घेउनि किंवा भगव्या वेषा।
मूढ न देखति देखुनि सारे
पोटास्तव करिती देव्हारे ॥ १४ ॥

गळल्या काती पिकले डोके
दातांवाचून तोंड बोळके।
तरिही फिरतो घेउनि काठी
आस तुटेना लोचट मोठी ॥ १५ ॥

पुढती विस्तव दिनकर पाठी
हनु गुडघ्यावर, रात्र ललाटी।
करतलभिक्षा तरुतलवासी
तरिही गुंते आशापाशी ॥ १६ ॥

करितो गंगासागरगमने
व्रतपरिपालन अथवा दाने
ज्ञानावाचुन शतजन्मेही
म्हणती श्रुति त्या मुक्तिहि नाही ॥ १७ ॥

सुरमंदिर तरुछाये राहे
शेज भुई, हरिणाजिन वाहे।
गृहसुतधनदारेते त्यागी
अक्षय सुखरत तोच विरागी ॥ १८॥

रत योगीं जो अथवा भोगी
संग-त्यागी अथवा संगी।
परि ज्याचे लय ब्रह्माठायी
आनंदित तो अविरत राही ॥ १९॥

गीता जो कुणि पढला थोडी
चाखुनि घे गंगाजल-गोडी।
घडिभरि जो पूजी गिरिधारी
यम न तयाचा राहे वैरी॥ २०॥

पुनरपि जनने, पुनरपि मरणे
पुनरपि जननी-जठरी शयने।
बहुदुस्तरतर या संसारी
कृपया माते तार मुरारी॥ २१॥

घालुनिया चिंध्यांची कंथा
पुण्यापुण्यविवर्जितपंथा
क्रमितो जो मुनि उन्मन चित्ती
बालोन्मत्तासम तद्वृत्ती ॥ २२॥

तू-मी कोण? नि कैसे आलो?
या जननी-जनकाचे झालो?
त्यागुनि जग हे स्वप्नपसारा
लागे सारासारविचारा ॥ २३॥

प्रत्येकाच्या ठायी विष्णु
चिडसी का होसी असहिष्णु ?
धरि सर्वत्री समचित्तत्वा
वांछिसि जरि तू चिरविष्णुत्वा ॥ २४ ॥

अरिमित्रांशी सुतबंधूंशी
संधीकलहि न करि सायासी ।
सर्वत्री बघ आत्मनिवेदा
टाकुनि अज्ञानोद्भव भेदा ॥ २५ ॥

कामक्रोधादिक जो त्यागी
तो योगी सोहं-सुख भोगी ।
आत्मज्ञानविहीना मूढा
जीवन हा नरकाचा खोडा ॥ २६ ॥

गीता नामसहस्रा गावे
श्रीहरिरूप सदैव स्मरावे ।
सज्जनसंगी लय लावावे
आर्तांप्रति धन काही द्यावे ॥ २७ ॥

जन सौख्यास्तव रमती भोगीं
अंती काया सडते रोगी ।
लोकी या जरि मरण चुकेना
पापाचरण तरीहि सुटेना ॥ २८ ॥

जाणावे नित धन धोक्याचे
त्यात न लेशहि नाव सुखाचे ।
सुत भार्येची देखिल भीती
जावे तेथे ही जनरीती ॥ २९ ॥

प्राणायामे प्रत्याहारे
नित्यानित्यविवेकविचारे ।
साध समाधी, ध्यान जपाने
स्थिर अवधाने, अति अवधाने ॥ ३० ॥

जोडुनि गुरुचरणांबुजभक्ती
संसारातुनि घे क्षणि मुक्ती ।
इंद्रियमानसनियमाधारे
ओळख निजहृदयस्थ मुरारे ॥ ३१ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## संग्रहशः निवडीचा तपशील

या संकलनात ' जीवनसंगीत ' ( १९३८ ) पासून ' चिन्मयी ' ( १९८४ ) पर्यंतच्या, बोरकरांच्या नऊही काव्यसंग्रहांतून निवडलेल्या ८१ कविता समाविष्ट असून, त्यांचा रचनाकाळ १९३२ ते १९८४ असा ५२ वर्षांचा आहे. शेवटच्या दोन अनुवादित रचना ( ' ईशावास्योपनिषद ' व ' भज गोविन्दम् ' ) वगळता बाकी सर्व कवितांचा क्रम रचनाकाळानुसार राखलेला आहे. निवडीविषयीच्या पुढील तपशिलात काव्यसंग्रहांच्या नावांपुढील क्रमांक ' कैवल्याचे झाड ' या प्रस्तुत संकलनाच्या ' अनुक्रमा 'तील आहेत.

**जीवनसंगीत** / १, २ ( २ कविता )
**दूधसागर** / ३, ५ ( २ कविता )
**आनंदभैरवी** / ४, ६ ते ८ ( ४ कविता )
**चित्रवीणा** / ९ ते १२ ( ४ कविता )
**गितार** / १७ ते २०, २२ ( ५ कविता )
**चैत्रपुनव** / २३, २४, २६ ते ३०, ३२ ते ३८, ४० ते ४२ (१७ कविता)
**कांचनसंध्या** / ४३, ४५ ते ५२, ५५, ५६, ५९ ते ६१ (१४ कविता)
**अनुरागिणी** / १३ ते १६, २१, २५, ३१, ३९, ४४, ५४, ५७, ५८, (१२ कविता)
**चिन्मयी** / ५३, ६२ ते ८१ ( २१ कविता )

**' ईशावास्योपनिषद् '** व **' भज गोविन्दम् '** हे दोन अनुवाद पूर्वी अनुक्रमे ' मांडवी ' ( बोरकर गौरवांक, नोव्हेंबर १९७० ) आणि ' शब्दरंजन '-मध्ये प्रकाशित झालेले आहेत.

आम्ही प्रकाशित केलेले
बा. भ. बोरकर यांचे कवितासंग्रह

१ / अनुरागिणी ( १९८२ )

२ / चिन्मयी ( १९८४ )

३ / बोरकरांची प्रेमकविता ( १९८४ )
प्रेमकवितांचे संकलन
संपादक : रा. चिं. ढेरे

४ / कैवल्याचे झाड ( १९८७ )
भक्तिकवितांचे संकलन

सुरेश एजन्सी, पुणे २